| १३ | **रेस्टॉरेन्ट, उपहारगृह** | १. सदर ठिकाणे **५० टक्के क्षमतेसह सुरू ठेवण्याची** मुभा असेल तथापि सदर मॉल्सचे एकूण क्षेमता आणि ग्राहकांची संख्याबाबत प्रवेशद्वाराजवळ नोटीस बोर्ड सर्वांना स्प्ष्ट दिसेल अशा ठळक पद्धतीने लावण्यात यावे.<br>२. कोविड अनुरुप वर्तन/निर्देश/नियमांचे पूर्ण बंधन पाळण्यात यावे.<br>३. दोन्ही लसीकरण झालेल्या नागरिकांनाच केवळ प्रवेश देण्यात यावे. याची संपूर्ण जबाबदारी संबंधित मॉल्स व्यवस्थापनाची असेल.<br>४. दररोज रात्रौ १० ते सकाळी ८ पर्यंत सदर दुकाने बंद असतील.<br>५. पार्सल सुविधा/होम डिलीव्हरी सुरु ठेवता येईल. |
| १४ | **नाट्यगृह/चित्रपटगृहे इ.** | १. सदर ठिकाणे **५० टक्के क्षमतेसह सुरू ठेवण्याची** मुभा असेल तथापि सदर मॉल्सचे एकूण क्षेमता आणि ग्राहकांची संख्याबाबत प्रवेशद्वाराजवळ नोटीस बोर्ड सर्वांना स्प्ष्ट दिसेल अशा ठळक पद्धतीने लावण्यात यावे.<br>२. कोविड अनुरुप वर्तन/निर्देश/नियमांचे पूर्ण बंधन पाळण्यात यावे.<br>३. दोन्ही लसीकरण झालेल्या नागरिकांनाच केवळ प्रवेश देण्यात यावे. याची संपूर्ण जबाबदारी संबंधित मॉल्स व्यवस्थापनाची असेल.<br>४. दररोज रात्रौ १० ते सकाळी ८ पर्यंत सदर दुकाने बंद असतील. |
| १५ | **आंतरराष्ट्रीय प्रवास** | केंद्र शासनाचे निर्देशाप्रमाणे |
| १६ | **देशांतर्गत प्रवास** | १. महाराष्ट्र राज्यात प्रवेश करतांना दोन्ही लसीकरण पूर्ण झाल्याचे प्रमाणपत्र वा प्रवासाचे ७२ तासादरम्याचे आरटीपीसीआर नकारात्मक अहवाल सोबत असणे गरजेचे आहे.<br>२. सदर बाब हवाई वाहतूक, रेज्वे वाहतूक, रस्ते वाहतूक ला लागू असेल.<br>३. रस्ते मार्गांनी प्रवास करणारे वाहनचालक/क्लीनर्स/इतर स्टाफ यांना सदर बाबींचे पूर्ण पालन करावे. |
| १७ | **कार्गो सेवा-वाहतूक, उत्पादन सेवा, बांधकाम कार्ये इ.** | दोन्ही लसीकरण पूर्ण झालेल्या नागरिकांकरिता सुरु असतील. |

| | | |
|---|---|---|
| १८ | **सार्वजनिक वाहतूक व्यवस्था** | दोन्ही लसीकरण पूर्ण झालेल्या नागरिकांकरिता नियमितपणे सुरु असतील. |
| १९ | **केंद्रीय लोकसेवा आयोग/राज्य लोकसेवा आयोग/वैधानिक संस्था/सार्वजनिक संस्था इ.** | १. राष्ट्रीय पातळीवरुन आयोजित होणाऱ्या सर्व परीक्षंकरिता केंद्र शासनाच्या निर्देशांचे पालन करणे बंधनकारक असेल. सदर परीक्षांकरिताचे प्रवेशपत्र हे अत्यावश्यक बाबीअंतर्गत वैध हालचालीस वैध पुरावा असेल.<br>२. राज्य पातळीवरुन आयोजित होणाऱ्या परीक्षांसंदर्भात ज्या परीक्षांचे ओळखपत्र जारी करण्यात आले आहेत अशा परीक्षा नियोजनाप्रमाणे घेता येईल तथापि इतर सर्व परीक्षांकरिता राज्य आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाची पूर्वपरवानगी घेणे बंधनकारक असेल.<br>**३.** सर्व परीक्षेदरम्यान कोविड अनुरुप वर्तन/निर्देश/नियमांचे पूर्ण बंधन पाळण्यात यावे. |
| २० | **आठवडी बाजार** | पुढील आदेशापर्यंत **बंद** असतील. |
| २१ | **व्यायामशाळा** | १. सदर ठिकाणे **५० टक्के क्षमतेसह सुरू** ठेवण्याची मुभा असेल.<br>२. व्यायामशाळांमध्ये कसरती करतांना पूर्णवेळ मास्कचे परिधान करणे बंधनकारक असेल.<br>३. दोन्ही लसीकरण पूर्ण झालेल्यांनाच व्यायामशाळेमध्ये प्रवेश देण्यात यावे तसेच व्यायामशाळाचे कर्मचाऱ्यांचे दोन्ही लसीकरण झालेले असणे अनिवार्य आहे.<br>४. कोविड अनुरुप वर्तन/निर्देश/नियमांचे पूर्ण बंधन पाळण्यात यावे.<br>५. तथापि सदर ठिकाणांमध्ये एसी चा वापर करता येणार नाही. |

१. **जबावबंदी व संचारबंदी अंतर्गत हालचालींकरिता वैध अत्यावश्यक बाबी:-**

   १. वैद्यकीय आपातकालीन सेवा

   २. सदर आदेशासह संलग्नित परिशिष्ट-1

   ३. विमानतळ, रेल्वे स्टेशन, बस स्टेशन इत्यादी ठिकाणी वैध तिकांटासह प्रवास

   ४. जे कार्यायले २४ तास सुरु असतील अशा कार्यालयांचे कर्मचाऱ्यांकरिता

२. कोविड अनुरुप वर्तनासंबंधी तरतुदी सदर आदेशासह संलग्नित परिशिष्ट-२ प्रमाणे असेल.

३. मॉलस्, दुकाने, रेस्टारेन्ट, उपहारगृहे, हॉटेल, ई-कॉमर्स सेवा, होम-डिलीव्हीरी/पार्सल सेवा शी संबंधित सर्व कर्मचाऱ्यांचे दोन्ही लसीकरण पूर्ण असणे गरजेचे आहे. तथापि दोन्ही लसीकरणाशिवाय सदर आस्थापना कार्यरत असल्याचे निदर्शनास आल्यास अशा संबंधित दुकाने/सेवा पुढील आदेशापर्यंत बंद करण्यात येऊन सदर व्यवस्थापनावर कारवाई करण्यात येईल. सदर दुकाने/सेवा संबंधित ठिकाणी वेळोवेळी कोविड-१९ रॅट चाचणी करण्यात यावे.

४. जिल्ह्यातील कोविड-१९ साथरोग व्यवस्थापनाकरिता शासकीय-निमशासकीय कार्यालये/संस्था मधील मनुष्यबळ, संसाधनाचे विनियोग करता येईल.

५. सदर आदेशात नमूद नसलेल्या इतर बाबींकरिता यापूर्वी लागू असलेले तरतुदी अंमलात असतील.

सदरीलआदेशाचे पालन न करणारी/ उल्लंघन करणारी कोणतीही व्यक्ती, संस्था अथवा समुह यांनीसाथरोग प्रतिबंधक कायदा १८९७, आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५ तसेच भारतीय दंडसंहिता १८६० नुसार शिक्षेस पात्र असलेला अपराध केला असे मानण्यात येईल व नियमानुसार कारवाई करण्यात येईल.

सदरचे आदेश आज दिनांक ०९/०१/२०२२ रोजी माझे सही व शिक्क्यानिशी निर्गमित करण्यात येत असून सदर आदेश गडचिरोली जिल्हा सीमा क्षेत्रात दिनांक १०/०१/२०२२ चे मध्यरात्री ००.०० ते पुढील आदेशापर्यंत लागू असेल.

Office of the District Magistrate

(संजय मीणा)
जिल्हाधिकारी व जिल्हादंडाधिकारी तथा अध्यक्ष,
जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, गडचिरोली

**प्रतिलिपी- माहितीस्तव सविनय सादर.**

१) मा. मुख्य सचिव,महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई-३२
२) मा. विभागीय आयुक्त, नागपूर विभाग, नागपूर
३) मा. प्रधान सचिव, आपत्ती व्यवस्थापन व मदत व पुनर्वसन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२

**माहितीस तथा आवश्यक कार्यवाहीस अग्रेषित.**

४) पोलीस अधिक्षक, गडचिरोली.
५) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, गडचिरोली
६) समादेशक, रारापोब, विसोरा, ता.देसाईगंज, जिल्हा गडचिरोली
७) अपर जिल्हाधिकारी, गडचिरोली/अहेरी
८) जिल्हा शल्य चिकीत्सक,गडचिरोली
९) जिल्हा आरोग्य अधिकारी, जि. प. गडचिरोली
१०) उपविभागीय अधिकारी तथा उपविभागीय दंडाधिकारी ---------------------- (सर्व) जिल्हा गडचिरोली
११) सहा. आयुक्त (अन्न व औषध प्रशासन), गडचिरोली
१२) पोलीस उपविभागीय अधिकारी---------------------- (सर्व) जिल्हा गडचिरोली
१३) तहसिलदार तथा तालुका दंडाधिकारी---------------------- (सर्व) जिल्हा गडचिरोली
१४) गट विकास अधिकारी ---------------------- (सर्व) जिल्हा गडचिरोली
१५) जिल्हा माहिती अधिकारी गडचिरोली यांनी वरीलप्रमाणे बाब विनामुल्य व्यापकस्तरावर प्रसिद्ध करावी
१६) जिल्हा प्रशासन अधिकारी, नगर पालिका प्रशासन गडचिरोली
१७) जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी, गडचिरोली
१८) मुख्याधिकारी, नगर परिषद/ पंचायती ---------------------- (सर्व) जिल्हा गडचिरोली
१९) सर्व विभागप्रमुख/कार्यालयप्रमुख --------------- जिल्हा गडचिरोली
२०) इतर सर्व संबंधित विभाग ----------
२१) स्थळ प्रत

Office of the District Magistrate

जिल्हाधिकारी व जिल्हादंडाधिकारी तथा अध्यक्ष,
जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, गडचिरोली

## परिशिष्ट-१

### अत्यावश्यक सेवा

१. **अत्यावश्यक सेवांमध्ये पुढील सेवांचा समावेश होतो:-**

1. रुग्णालये, रोगनिदानकेंद्रे, चिकित्सालये, वैद्यकीय विमा कार्यालये, औषध विक्रेते, औषध निर्माण कंपन्या, इतरउत्पादन व वितरणासह वैद्यकीय व आरोग्यसेवा तसेच त्यांचे डीलर्स, वाहतूक व वितरण साखळी. कोविड साथरोग संबंधी लस, सॅनिटायझर, मास्क, वैद्यकीय साहित्ये, कच्चे उत्पादने/सेवा इ.
2. व्हेटरीनरी हॉस्पीटल्स/ॲनिमल केअर सेंटर्स व पेट फुड शॉप्स
3. वनविभागाने घोषित केलेले वनीकरणासंदर्भातील कामे
4. ऍवियेशन आणि संबंधी सेवा (एअरलाईन, विमानतळे, देखभाल, कार्गो, इंधन, सुरक्षा इ.)
5. किराणा मालाची दुकाने, भाजीपाल्याची दुकाने, फळविक्रेते, दूधपुरवठाकेंद्रे (दुग्धशाळा), बेकरी, मिठाईची दुकाने व इतर सर्व प्रकारची खाद्यान्नदुकाने. (**परंतु पानटपरी/पानठेले, तंबाखुजन्य व्यवसाय सुरु ठेवता येणार नाही.**)
6. कोल्स्ड स्टोरेज व वेअरहाऊसिंग संबंधित सेवा
7. सार्वजनिकपरिवहन- रेल्वेगाड्या, टॅक्सी, ऑटोरिक्षावसार्वजनिकबस.
8. विविध देशांच्या राजदूतांच्या कार्यालयांच्या कामकाजाशी संबंधित असलेल्या सेवा.
9. स्थानिक प्राधिकरणांद्वारे केली जाणारी मान्सूनपूर्व (पावसाळापूर्व) कामे.
10. स्थानिक प्राधिकरणांद्वारे पुरविल्या जाणाऱ्या सर्व सार्वजनिक सेवा.
11. भारतीय रिझर्व बँकेने विनियमित केलेल्या संस्था
12. टेलिकॉम सेवाशी संबंधित देखभाल/दुरुस्तीची कामे
13. मालवाहतूक.
14. पाणी पुरवठाशी संबंधित कामे
15. कृषी संबंधित सेवा व बी-बियाणे, खते, साहित्ये, दुरुस्ती इ. दुकाने
16. साहित्यांचे निर्यात-आयात
17. ई- वाणिज्य (केवळ अत्यावश्यक साहित्यांचे पुरवठासंदर्भात)
18. अधिस्वीकृतप्रसारमाध्यमे
19. पेट्रोलपंपआणिपेट्रोलियमशीसंबंधितअसलेलीउत्पादने
20. सर्व कार्गो सेवा
21. विदाकेंद्रे (डेटासेंटर्स)/क्लाऊड सेवा पुरवठादार / निर्णायक स्वरूपाच्या (क्रिटिकल) पायाभूत सुविधा व सेवा यांना सहाय्यभूत असणाऱ्या माहिती तंत्रज्ञान सेवा.
22. शासकीय व खाजगी सुरक्षासेवा
23. इलेक्ट्रिक व इंधन गॅस पुरवठा
24. बँकांची एटीएम्स
25. पोस्टल सेवा
26. सीमाशुल्कगृहअभिकर्ते/लसी /जीवरक्षक औषधे/ औषधनिर्मितीशी संबंधित उत्पादने यांची वाहतूक करण्यामध्ये सहयोगी असलेले लायसन्सधारक बहुप्रतिमान वाहतूक कार्यचालक

27. अत्यावश्यक सेवामध्ये मोडणाऱ्या बाबींकरिता पॅकेजिंग करणारी उत्पादने.
28. पावसाळ्यात आवश्यक असणात्या महत्त्वाच्या साधनसामुग्रीशी संबंधित उत्पादने
29. केंद्र, राज्य, स्थानिक स्वराज्य संस्थेचे कार्यालये तसेच त्यांचेशी संबंधित वैधानिक संस्थेचे कार्यालये
30. सार्वजनिक बँका, सार्वजनिक उपक्रम, सहकारी संस्था
31. अत्यावश्यक सेवा उपलब्ध करुन देणाऱ्या कंपन्यांची कार्यालये
32. वीमा/आरोग्य् वीमा कार्यालये
33. औषध उत्पादन/वितरणसंबंधी फार्मासिटयुकल कंपनी
34. आरबीआई तर्फे मान्यताप्राप्त सीसीआएल, एनपीसीआई, पेमेंट सिस्टीम इ.
35. सर्व नॉन बँकिंग वित्त महामंडळे
36. सर्व वैध सूक्ष्म वित्त पुरवठा संस्था
37. न्यायालये, लवादे, चौकशी कार्यालये, वकिलांचे कार्यालये
38. जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाने घोषित केलेले अत्यावश्यक सेवासंबंधित दुकाने/आस्थापना
39. आपले सरकार केंद्र/सीसीसी/सेतु केंद्र **(परंतु सदर ठिकाणी ५ पेक्षा अधिक लोक एकत्र येणार नाहीत याची दक्षता संबंधितांनी घेण्यात यावी.)**

२. **संकीर्णः-**

1. उक्त निर्देशांचे काटेकोर अंमलबजावणी करण्याची जबाबदारी ही संबंधित तालुक्यांचे **तहसिलदार** तथा इन्सिडंट कमांडटंट यांची असेल. त्यांनी संबंधित क्षेत्राचे मुख्याधिकारी- न.प./न.पं., पोलीस निरीक्षक यांचेसमवेत आवश्यक अंमलबजावणी करावी. तसेच गर्दीचे ठिकाणांवर, दुकानांमध्ये उक्त निर्देशांचे पालन होत आहे किंवा नाही याबाबत भरारी पथकांच्या माध्यमांतून उचित संनियंत्रण ठेवावे. जे व्यक्ती/आस्थापना/दुकाने कोविड-१९ साथरोगसंदर्भाने निर्देशांचे पालन करीत नसल्याचे निदशर्नास आल्यास त्यांचेवर रीतसर कारवाई करण्यात यावी.
2. संबंधित आदेशांचे योग्य अंमलबजावणी होत असल्याबाबत संनियंत्रयणाची जबाबदारी ही संबंधित क्षेत्राचे **उपविभागीय अधिकारी (राजस्व)** यांची असेल.
3. आरोग्य विभागाने कोविड-१९ लसीकरणासंदर्भाने व्यापक जनजागृती करावी व लवकरात लवकर **लसीकरण**उद्दिष्ट पूर्ण करण्याच्या दृष्टीने काटेकोर नियोजन करावे व आवश्यक उपाययोजना पूर्ण करावे तसेच कोविड-१९ चा प्रसार रोखण्यासाठी टेस्ट-ट्रेक-ट्रीट या त्रिसुत्रीचा व्यापक प्रमाणात वापर करावा.
4. सर्व संबंधित अधिकारी/कर्मचारी व विभागांनी आरटीपीसीआर तपासणींची संख्या वाढवावी.
5. महसूल/पोलीस/स्थानिक स्वराज्य संस्था यांनी कोविड-१९ साथरोगसंदर्भाने प्रशासनाने दिलेल्या निर्देशांचे पालन न करणाऱ्यांवर प्रभावीपणे दंडात्मक कारवाई करावी.
6. सर्व संबंधित यंत्रणांनी अत्यावश्यक साधने व सुविधा यांची साठेबाजी व काळाबाजार करणाऱ्यांविरुद्ध नियमाप्रमाणे कठोर कारवाई करावी.

## परिशिष्ट २
## कोविड अनुरूप वर्तन (CAB)

**व्याख्या:**

कोविड 19 विषाणूचा प्रसार रोखण्यासाठी व्यक्ती आणि संस्थांना आवश्यक असलेले दैनंदिन सामान्य वर्तन म्हणून कोविड अनुरूप वर्तनाची व्याख्या केली जाऊ शकते ज्यामुळे साथरोग प्रसाराची साखळी खंडित होते. कोविड अनुरूप वर्तन म्हणून वैशिष्ट्यीकृत वर्तनातंर्गत खाली नमूद केलेल्या पैलूंचा समावेश आहे आणि अशा सर्व तर्कसंगत बाबी देखील समाविष्ट आहेत जे कोविड १९ विषाणूच्या प्रसारास अडथळा आणू शकतात त्याची कार्यपद्धती खालीलप्रमाणे असून सदर मूलभूत कोविड अनुरूप वर्तनातंर्गत सदर बाबींचे पालन सर्वसंबंधितांने करणे अनिवार्य आहे.

a) मास्कचा वापर नेहमी योग्य पद्धतीने करावा. मास्कने नेहमीच नाक आणि तोंड झाकले गेले पाहिजे.(रुमाल/गमचा/दुपट्टा इ. हा मुखपट्टी म्हणून मानला जाणार नाही आणि व्यक्ती नियमाप्रमाणे दंडास पात्र असेल.)

b) जिथे शक्य असेल तिथे नेहमीच सामाजिक अंतर (६ फूट अंतर) राखावे.

c) हात साबणाने किंवा सॅनिटायझरने वारंवार आणि स्वच्छ धुवावेत.

d) हात सॅनिटायझरने धुतलेले नसल्यास हाताने नाक/डोळे/तोंडाला स्पर्श करणे टाळावे.

e) हवा खेळती राहण्याकरीता व्हेंटीलेशन व्यवस्थित राहील याबाबत दक्षता घ्यावी.

f) वारंवार साफ केलेले पृष्ठभाग नियमितपणे स्वच्छ आणि निर्जंतुक करा.

g) खोकताना किंवा शिंकताना टिश्यूचा वापर करावा आणि वापरलेले टिश्यू कचरापेटीमध्ये टाकावेत. जर, खोकताना किंवा शिंकताना एखाद्याकडे टिश्यू पेपर नसल्यास वाकलेल्या कोपरात शिंकावे, खोकताना किंवा शिंकताना तळहाताचा वापर करू नये.

h) सार्वजनिक ठिकाणी थुंकू नये.

i) अत्यावश्यक काम नसल्यास घराबाहेर पडणे टाळावे.

j) गर्दी टाळा आणि सार्वजनिक ठिकाणी सुरक्षित अंतर (६ फूट अंतर) राखा. एकमेकांना भेटताना हस्तांदोलन टाळा व सुरक्षित अंतर राखूनच नमस्कार करावा.

k) एकमेकांना भेटताना शारिरीक संपर्क टाळावा.

### A. कामाचे ठिकाणावरील कोविड अनुरूप वर्तन

1. कामाच्या ठिकाणी कामकाज व्यवस्थितपणे चालण्यासाठी आवश्यक असलेल्या कर्मचारी संख्येस तसेच शिफ्टमध्ये कामकाज होत असल्यास एका शिफ्टमध्ये जितके कर्मचारी उपस्थित राहु शकतात तितक्या कर्मचाऱ्यांनाच एका शिफ्टमध्ये काम करण्याची परवानगी असेल. कर्मचाऱ्यांची संख्या वेळोवेळी निर्गमित होणाऱ्या आदेशांद्वारे निश्चित करण्यात येईल.
2. कलम 1 नुसार कोविड योग्य वर्तनाचे पालन करणे सर्वांना बंधनकारक असेल. कामाच्या ठिकाणी कोविड योग्य वर्तनाचे अंमलबजावणी करीता संबंधित संस्था/आस्थापनांचे मालक जबाबदार राहतील. कामाचे ठिकाणी गर्दी होऊ नये व शारिरीक अंतर राखणे सोयीचे व्हावे याकरीता कर्मचाऱ्यांच्या शिफ्टमध्ये, जेवणाच्या वेळेमध्ये आवश्यकतेनूसार बदल करावेत. कामाच्या ठिकाणी भोजन कक्ष असल्यास भोजनालयांकरीता असलेल्या नियमावलीचे पालन करण्यात यावे. जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाच्या परवानगीने शिफ्टची संख्या वाढविता येईल. वेळेच्या निर्बंधांमुळे काम थकीत राहत असल्यास शिफ्टची संख्या वाढविता येईल.

3. सर्व प्रवेश ठिकाणी आणि बाहेर पडण्याच्या ठिकाणांवर आणि सार्वजनिक भागात स्कॅनिंग, हँड वॉश आणि सॅनिटायझरची सोय शक्यतो टच फ्री मेकॅनिझमसह करण्यात यावी. याव्यतिरिक्त, कामाच्या ठिकाणी पुरेशा प्रमाणात हँडवॉश आणि सॅनिटायझर उपलब्ध करून द्यावे.
4. कामकाजाचे संपूर्ण ठिकाण, सार्वजनिक सुविधा असलेले ठिकाणे व जेथे वारंवार हात लावण्यात येतो अशा जागा जसे की, दरवाज्याचे हॅडल, इत्यादी वारंवार सॅनिटाइझ करण्याबाबत दक्षता घ्यावी. (शिफ्ट मध्ये कामकाज चालत असल्यास शिफ्टमध्ये सॅनिटाइझ करण्यात यावे)
5. आरोग्य सेतू ॲपचा वापर करणे खाजगी तसेच सरकारी कर्मचाऱ्यांसाठी अनिवार्य असेल.
6. कार्यस्थळाच्या आसपासज्या भागातील कोविड-19 चा उपचार करणा-या अधिकृत दवाखान्यांची अद्यावत माहिती कार्यस्थळी नेहमी उपलब्ध असावी. कार्यस्थळी काम करणाऱ्यांना कोविड-19 ची लक्षणे आढळून आल्यास ताबडतोब सदर रूग्णालयांमध्ये तपासणी करीता पाठविण्यात यावे. कोविड-19 चे कोणतेही लक्षण दर्शविणाऱ्या कर्मचाऱ्यांना तात्काळ अशा सुविधांमध्ये तपासणीसाठी पाठवण्यात यावे.

## B. समारंभ/गर्दी व्यवस्थापन संदर्भाने कोविड अनुरूप वर्तन

### अ) विवाह कार्यक्रम:-

1. समारंभांमध्ये उपस्थितांची संख्या तसेच कालावधी वेळोवेळी निर्गमित करण्यात येणाऱ्या आदेशांद्वारे निर्धारित करण्यात येईल.**(सध्या लागू असलेले कमाल संख्या सदरील आदेशातील मुद्दा क्र. ४ ते ६ मध्ये नमूद आहे.)**
2. सर्व उपस्थित तसेच सेवा पुरविणाऱ्यांना फेस मास्क वापर करणे व संपूर्ण समारंभात सामाजिक अंतर राखणे बंधनकारक असेल तसेच कलम 1 मध्ये नमूद केल्याप्रमाणे कोविड अनुरूप वर्तनाचे पालन करावे लागेल.
3. भोजन वाढताना कमीत कमी संपर्क होईल अशा प्रकारे नियोजन करावे. भोजनालये/रेस्टॉरंटसाठीअसलेल्या मार्गदर्शक तत्त्वांचे पालन करावे. **भोजन कक्षात वा क्षेत्रात एकावेळी उपलब्ध क्षमतेच्या ५० टक्के तसेच अनुज्ञेय कमाल मर्यादेच्या अधीन राहूनच उपस्थितांनाच प्रवेश असेल.**
4. उपस्थितांना/आमंत्रितांना स्कॅनिंग, हँड वॉश आणि सॅनिटायझर मुबलक प्रमाणात पुरविणे हॉल मालकास/संस्थेस बंधनकारक असेल. सेवा व सुविधा पुरविणा-या सर्व कर्मचाऱ्यांचे (यामध्ये सफाई कर्मचारी आणि केटरींग सुविधा पुरविणारे यांचा समावेश असेल) कोविड लसीकरण झालेले असणे अनिवार्य असेल.
5. कोणताही कर्मचारी वैध चाचणीशिवाय आढळल्यास प्रत्येक कर्मचाऱ्यांवर स्वतंत्रपणे तसेच संबंधित हॉल/सभागृह चालक/संस्थेवर दंड आकारण्यात येईल. आमंत्रित/उपस्थितांकडून नियमांचे उल्लंघन झाल्यास वधु, वर पक्षाकडून तसेच हॉलमालकाकडून दंड वसूल करण्यात येईल. जर कोणतीही संस्था किंवा आस्थापना तिचे अभ्यागत, ग्राहक, इत्यादींमध्ये कोविड अनुरूप वर्तनाची अमलबजावणी करण्यामध्ये नियमितपणे कसूर करीत असल्याचे दिसून आले तर, एक आपत्ती म्हणून कोविड-१९ ची अधिसूचना अंमलात असेपर्यंत, अशी संस्था किंवा आस्थापना बंद करण्यात येईल.

### ब) अंत्यविधी:-

1. सर्व उपस्थित व्यक्तींनी मास्क लावणे बंधनकारक असेल आणि अंत्यविधी दरम्यान सामाजिक अंतर राखणे तसेच कलम 1 मध्ये नमूद कोविड योग्य वर्तनाचे पालन करणे बंधनकारक असेल.
2. स्थानिक स्वराज्य संस्था/विश्वस्त मंडळे/ संस्था कोविड योग्य वर्तणूकीची अंमलबजावणी ची खातरजमा करण्याकरीता जबाबदार असतील.
3. उपस्थितांची संख्या वेळोवेळी निर्गमित होणाऱ्या आदेशांद्वारे निश्चित करण्यात येईल. **(सध्या लागू असलेले कमाल संख्या सदरील आदेशातील मुद्दा क्र. ४ ते ६ मध्ये नमूद आहे)**

**क) सामाजिक, धार्मिक, निवडणूक, मनोरंजन किंवा सांस्कृतिक संमेलने:**

1. उपरोक्त कार्यक्रमांसाठी उपस्थितांची कमाल संख्या वेळोवेळी निर्गमित होणाऱ्या आदेशांद्वारे निश्चित करण्यात येईल. **(सध्या लागू असलेले कमाल संख्या सदरील आदेशातील मुद्दा क्र. ४ ते ६ मध्ये नमूद आहे.)**
2. भोजनव्यवस्था असल्यास स्वतंत्रपणे भोजन कक्ष स्थापन करण्यात यावा व तेथे भोजनालयांसाठी असणा-या नियमांचे पालन करण्यात यावे. जर कोणत्याही वेळी निबंर्धांमध्ये वाढ करण्यात आल्यास अशा ठिकाणी भोजन करण्यास मनाई असेल.
3. सर्व उपस्थित तसेच सेवा पुरविणा-यांना फेस मास्क वापर करणे व संपूर्ण समारंभात सामाजिक अंतर राखणे बंधनकारक असेल तसेच कलम 1 मध्ये नमूद केल्याप्रमाणे कोविड अनुरूप वर्तनाचे पालन करावे लागेल.
4. **कोविड अनूरूप वर्तनाचे पालनास सदर कार्यक्रम स्थळाच्या मालकास जबाबदार ठरविण्यात येईल.**
5. निवडणूक संबंधित मेळावे वा कार्यक्रम आयोजित करताना स्थानिक निवडणूक अधिकाऱ्यांनी कमीत कमी उपस्थितांच्या संख्येत सदर कार्यक्रम वा मेळावे पार पडतील याकरीता कार्यरत प्रयत्नशील रहावे.

## C) सार्वजनिक व खाजगी वाहतूकीसंदर्भाने कोविड अनुरूप वर्तन

1. **टॅक्सी/ऑटो आणि इतर खाजगी वाहतुक ऑपरेटर (बस/रेल्वे वगळता) :-**
   I. प्रत्येक फेरी नंतर वाहनांचे निर्जंतुकीकरण (Sanitize) करणे आवश्यक राहील.
   II. वाहनात बसलेल्या प्रवाश्यांपैकी कुणाही एका प्रवाश्याने मास्क चा योग्य प्रकारे वापर न केल्यास, वाहन चालक व संबंधित प्रवासी दंड आकारण्यात येईल.
2. **बसेस:-**
   I. बसमधील प्रवासी संख्या वेळोवेळी निर्धारित करण्यात येईल.
   II. बसमध्ये बसलेल्या प्रवाश्यांपैकी कुणाही प्रवाश्याने मास्क चा योग्य प्रकारे वापर न केल्यास वा कोविड योग्य वर्तनाचे पालन न केल्यास संबंधित प्रवाशास प्रवासाची परवानगी देता येणार नाही.
   III. **कोविड योग्य वर्तनाचे अंमलबजावणी करण्याकरीता या आदेशानूसार सार्वजनिक वाहतूक कार्यालये/प्राधिकरणांना दंड आकारण्याची परवानगी असेल.**
3. **रेल्वे:-**
   I. सर्व प्रवाशांनी कोविड योग्य वर्तनाचे पालन करणे बंधनकारक असेल. रेल्वेने प्रवास करण्याकरीता राज्य आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाद्वारे मंजूर करण्यात आलेले युनिव्हर्सल पास बाळगणे अनिवार्य असेल. असे पास कोविड लसीकरणाचे दोन्ही डोस घेतलेल्यांनाच मिळतील.
   II. प्रवासी जर मास्क चा योग्य प्रकारे वापर करत नसेल वा कोविड योग्य वर्तनाचे पालन योग्यरितीने करत नसेल तर अशा प्रवाशास रेल्वेतून प्रवास करता येणार नाही.
   III. रेल्वे प्राधिकरणास या आदेशानूसार कोविड योग्य वर्तनाचे पालन न करणाऱ्या दंड आकारण्याचे अधिकार असतील.
   IV. रेल्वे प्रवासादरम्यान सर्व प्रवाशांनी मास्कचा योग्य वापर करणे बंधनकारक असेल तसेच साधारण कोचमध्ये आसनक्षमतेपेक्षा जास्त प्रवाशांना प्रवास करता येणार नाही. (उभ्याने प्रवास करण्यास मनाई असेल). या नियमांचे उल्लंघन केल्यास रू. 500 इतका दंड आकारण्यात येईल.
4. **खाजगी कार:-**
   1. खाजगी कारने अनेक प्रवासी प्रवास करत असल्यास (एकाच परिवारातील व्यक्ती नसल्यास) सर्वांनी मास्कचा योग्य वापर करणे बंधनकारक असेल. नियमाचे उल्लंघन केल्यास संबंधितांवर दंड आकारण्यात येईल.

## D. शॉपिंग मॉल्स/सिनेमागृहे (मल्टीस्क्रिन व सिंगल स्क्रिन)

1. सदर ठिकाणे या आदेशात नमुद वेळेत व दिवसांमध्ये सुरू राहतील यामध्ये वेळोवेळी निर्गमित होणाऱ्या आदेशाद्वारे बदल होऊ शकतो.
2. सदर ठिकाणी येणारे आगंतुक व कर्मचारी यांनी कोविड योग्य वर्तनाचे पालन करणे बंधनकारक असेल. सदर ठिकाणी कोविड अनूरूप वर्तनाचे पालन होत नसल्याचे निदर्शनास आल्यास संबंधित कर्मचारी/चालक/दुकानमालक/व्यवस्थापन यांचेवर कारवाई करण्यात येऊन दंड आकारण्यात येईल.जर कोणतेही ग्राहक कोविड अनूरूप वर्तनाचे पालन करीत नसल्यास सदर ग्राहकांना सेवा पुरविण्यात येऊ नयेत तथापि असे निदर्शनास आल्यास संबंधित ग्राहकासह संबंधित चालक/दुकानमालक/व्यवस्थापन यांचेवरसुद्धा दंड आकारण्यात येईल. जर कोणतीही संस्था किंवा आस्थापना तिचे अभ्यागत, ग्राहक, इत्यादींमध्ये कोविड अनुरूप वर्तनाची अमलबजावणी करण्यामध्ये नियमितपणे कसूर करीत असल्याचे दिसून आले तर, एक आपत्ती म्हणून कोविड-१९ ची अधिसूचना अंमलात असेपर्यंत, अशी संस्था किंवा आस्थापना बंद करण्यात येईल.

## E. शिक्षा/दंड/शास्ती

१. या नियमांनुसार अपेक्षित असलेल्या कोविड अनुरूप वर्तनाचे पालन न करणाऱ्या कोणत्याही व्यक्तीला, नियमाचे उल्लंघन केल्याच्या प्रत्येक प्रसंगी, रुपये ५००/- इतका दंड करण्यात येईल.

२. ज्यांनी आपले अभ्यागत, ग्राहक, इत्यादींवर कोविड अनुरूप वर्तन लादणे अपेक्षित आहे अशा संस्थेच्या किंवा आस्थापनेच्या कोणत्याही परिवास्तूत (जागेत), जर एखाद्या व्यक्तीने कसूर केल्याचे दिसून आले तर, त्या व्यक्तीवर दंड लादण्याव्यतिरिक्त, अशा संस्थांना किंवा आस्थापनांना सुद्धा रुपये१० ,०००/- इतका दंड करण्यात येईल. जर कोणतीही संस्था किंवा आस्थापना तिचे अभ्यागत, ग्राहक, इत्यादींमध्ये कोविड अनुरूप वर्तनाची अमलबजावणी करण्यामध्ये नियमितपणे कसूर करीत असल्याचे दिसून आले तर, एक आपत्ती म्हणून कोविड-१९ ची अधिसूचना अंमलात असेपर्यंत, अशी संस्था किंवा आस्थापना बंद करण्यात येईल.

३. जर एखाद्या संस्थेने किंवा आस्थापनेने स्वत: च कोविड अनुरूप वर्तनाचे (CAB) किंवा प्रमाण कार्यचालन कार्यपद्धतीचे (SOP) पालन करण्यात कसूर केली तर ती प्रत्येक प्रसंगी रूपये ५०,०००/- इतक्या दंडास पात्र असेल. वारंवार कसूर केल्यास एक आपत्ती म्हणून कोविड-१९ ची अधिसूचना अंमलात असेपर्यंत ती संस्था किंवा आस्थापना बंद करण्यात येईल.

४. जर कोणत्याही टॅक्सीमध्ये किंवा खाजगी वाहतूक करणाऱ्या चारचाकी वाहनात किंवा कोणत्याही बसमध्ये, कोविड अनुरूप वर्तनात कसूर केली जात असल्याचे आढळून आले तर, कोविड अनुरूप वर्तनात कसूर करणाऱ्या व्यक्तींनारूपये ५००/- इतका दंड करण्यात येईल, तसेच सेवा पुरविणारे वाहनचालक, मदतनीस, किंवा वाहक यांना देखील रूपये ५००/- इतका दंड करण्यात येईल. बसेसच्या बाबतीत, मालक परिवहन एजंन्सीस, कसूरीच्या प्रत्येक प्रसंगी, रुपये १०,०००/- इतका दंड करण्यात येईल. वारंवार कसूर केल्यास, एक आपत्ती म्हणून कोविड-१९ ची अधिसूचना अंमलात असेपर्यंत, संबंधित मालक एजन्सीचे लायसन्स काढून घेण्यात येईल किंवा तिचे परिचालन बंद करण्यात येईल.

५. कोविड अनुरूप वर्तणुकी संबंधीच्या वर नमूद केलेल्या नियमांचे, पालन करणे अनिवार्य असून त्यांचे उल्लंघन केल्यास वर नमूद केल्यानुसार दंड व शास्ती करण्यात येईल तसेच आपत्ती व्यवस्थापन अधिनियम, २००५ नुसार कोणऱ्याही आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाद्वारे, उल्लघंन करणाऱ्यंवर इतार कोणताही दंड किंवा शास्ती लादता येईल. कोविड अनुरूप वर्तनाचे निमय/धोरणे, पवरीलप्रमाणे असतील आणि त्यामध्ये विशेषरित्या नमूद न केलेले कोविड अनुरूप वर्तनाशी संबंधित असणारे इतर कोणतेही विषय/मुद्दे, राज्य शासनाच्या अंमलात असलेल्या प्रचलित नियमांनुसार/आदेशानुसार असतील.

# जिल्हा दंडाधिकारी चंद्रपूर यांचे कार्यालय

ई-मेल : chandrapur.rdc@ gmail.com	दुरध्वनी क्रमांक- 07172-250659
क्रमांक.एमएजी/कार्या-8/टे.3/सांले/2022/14	दिनांक : 09 जानेवारी, 2022

---

**वाचा** :- 1. साथरोग कायदा, 1897
2. आपत्ती व्यवस्थापन कायदा, 2005 चे कलम 30, 33, 34, 41 व कलम 51
3. फौजदारी प्रक्रिया संहिता, 1973
4. मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य यांचे आदेश क्र.कोरोना-2021/प्र.क्र.366/आ-5 दि. 11.08.2021.
5. या कार्यालयाचे आदेश क्र.एमएजी/कार्या-8/टे.3/सांले/2021/893 दि. 14/08/2021.
6. मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य सार्वजनिक आरोग्य विभाग यांचे आदेशक्र.कोरोना-2021/प्र.क्र.366/आ-5 दि. 24.09. 2021.
7. या कार्यालयाचे आदेश क्र.एमएजी/कार्या-8/टे.3/सांले/2021/1012 दि. 29/09/2021.
8. या कार्यालयाचे आदेश क्र.एमएजी/कार्या-8/टे.3/सांले/2021/1018 दि. 01/10/2021.
9. या कार्यालयाचे आदेश क्र.एमएजी/कार्या-8/टे.3/सांले/2021/1054 दि. 07/10/2021.
10. पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग शासन निर्णय क्र.संकीर्ण 2020/प्र.क्र.65/सां.का.4 दिनांक 11/10/2021
11. या कार्यालयाचे आदेश क्र.एमएजी/कार्या-8/टे.3/सांले/2021/1069 दि. 14/10/2021.
12. पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग शासन निर्णय क्र.संकीर्ण 2020/प्र.क्र.65/सां.का.4 दिनांक 11/10/2021.
13. या कार्यालयाचे आदेश क्र.एमएजी/कार्या-8/टे.3/सांले/2021/1068 दि. 14/10/2021
14. पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग शासन निर्णय क्र.संकीर्ण 8220/प्र.क्र.211/सां.का.4 दिनांक 11/10/2021.
15. या कार्यालयाचे आदेश क्र.एमएजी/कार्या-8/टे.3/सांले/2021/1067 दि. 14/10/2021
16. मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य यांचे आदेश क्र.कोरोना-2021/प्र.क्र.422/आ-5 दि. 18/10/2021.
17. या कार्यालयाचे आदेश क्र.एमएजी/कार्या-8/टे.3/सांले/2021/1097 दि. 20/10/2021
18. मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य यांचे आ. क्र.कोरो-2021/प्र.क्र.422/आ-5 दि.26.10.2021
19. या कार्यालयाचे आदेश क्र.एमएजी/कार्या-8/टे.3/सांले/2021/1131 दि. 29/10/2021
20. मा. मुख्य सचिव, महसूल व वन, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन विभाग, महाराष्ट्र शासन आदेश क्र. डीएमयु/ 2020/ सीआर,92/DisM-1 दि. 27.11.2021
21. या कार्यालयाचे आदेश क्र.एमएजी/कार्या-8/टे.3/सांले/2021/1203 दि. 29/11/2021.
22. मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य यांचे आदेश क्र.डीएमयु/2020/सीआर-92/डीआयएसएम1 दि. 24/12/2021.
23. या कार्यालयाचे आदेश क्र.एमएजी/कार्या-8/टे.3/सांले/2021/1313 दि. 25/12/2021.
24. मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य यांचे आदेश क्र.डीएमयु/2020/सीआर-92/डीआयएसएम-1 दि. 30/12/2021.
25. या कार्यालयाचे आदेश क्र.एमएजी/कार्या-8/टे.3/सांले/2021/1314/ दि.31/12/2021
26. मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य यांचे आदेश क्र.डीएमयु/2020/सीआर-92/डीआयएसएम-1 दि. 08/01/2022.
27. मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य यांचे आदेश क्र.डीएमयु/2020/सीआर-92/डीआयएसएम-1 दि. 09/01/2022.

: : **आदेश** : :

ज्याअर्थी, आपत्ती व्यवस्थापन कायदा 2005 मधील कलम 25 अन्वये जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाची स्थापना करण्यात आलेली आहे व त्यातील पोट कलम 2 (अ) नुसार जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी हे उक्त प्राधिकरणाचे पदसिध्द अध्यक्ष आहेत.

आणि ज्याअर्थी, राज्य शासनाने कोरोना विषाणूचा (कोव्हिड-19) प्रादुर्भाव रोखण्यासाठी राज्यात साथरोग कायदा 1897 दिनांक 13 मार्च 2020 पासून लागू करुन खंड 2, 3, व 4 मधील तरतुदींची अंमलबजावणीसाठी अधिसूचना निर्गमित केलेली आहे व त्याबाबतची नियमावली प्रसिध्द करुन जिल्हाधिकारी यांना सक्षम प्राधिकारी घोषीत केलेले आहे.

आणि ज्याअर्थी, कोविड-19 या संसर्गजन्य रोगाचा प्रादुर्भाव होण्यास प्रतिबंध करणे याकरीता या कार्यालयाचे यापुर्वीचे संदर्भिय आदेश निर्गमित करण्यात आलेले आहेत व सद्यस्थितीत सदर आदेशाच्या तरतूदी चंद्रपूर जिल्हयात लागू आहेत.

आणि ज्याअर्थी, मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य यांनी संदर्भिय क्र. 26 व 27 चे आदेशान्वये, कोविड-19 (ओमायक्रान) विषाणूचा फैलाव होण्यास प्रतिरोध (प्रतिबंध) करण्यासाठी सदर साथरोग संदर्भाने उचित प्रतिबंधात्मक नियमावली व उपाययोजना लागू करण्यात आले आहे.

त्याअर्थी, **मी, अजय गुल्हाने, जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, चंद्रपूर,या आदेशाव्दारे** चंद्रपूर जिल्हयातील कोविड-19 विषाणूचा नजिकच्या काळात फैलाव होण्यास प्रतिरोध (प्रतिबंध) करण्यासाठी राज्य शासनाचे संदर्भिय क्रमांक 26 व 27 चे निर्देशाप्रमाणे खालील प्रमाणे उचित प्रतिबंधात्मक नियमावली आणि उपाययोजना चंद्रपूर जिल्हयाचे कार्यक्षेत्रात दि. 10.01.2022 चे मध्ये रात्री 00.01 वाजेपासुन लागु करीत आहे.

| **क्षेत्र** | **लागु असलेले निर्बंध** |
|---|---|
| नागरीकांचे बाहेर फिरणे | 1. पाच किंवा त्याहून जास्त लोकांच्या समूहाला बाहेर फिरण्यासाठी पहाटे 5 ते रात्री 11 पर्यंत बंदी.<br>2. अत्यावश्यक कारणाशिवाय बाहेर फिरण्यासाठी रात्री 11 ते पहाटे 5 वाजेपर्यंत बंदी. |
| शासकीय कार्यालय | 1. महत्वाच्या कामासाठी कार्यालय प्रमुखाच्या लेखी परवानगीविना आगंतुकांवर बंदी.<br>2. कार्यालय प्रमुखांनी नागरीकांसाठी व्हिडीओ कॉन्फरन्सिग सुविधेची व्यवस्था करावी.<br>3. बाहेरून येणा-या लोकांसाठी व्हिडीओ कॉन्फरन्सिंग बैठकीची व्यवस्था<br>4. कार्यालय प्रमुखांच्या गरजेनुसार वर्क फ्रॉम होमला प्रोस्ताहन देत कार्यालयीन वेळेत कार्यालयात प्रत्यक्ष उपस्थित राहणा-या कर्मचा-यांची संख्या कमी करणे तसेच गरजेनुसार कार्यालयीन कामकाजाच्या वेळांमध्ये बदल करणे. याकरीता कर्मचा-यांसाठी कामाच्या वेळांमध्ये बदलाचाही विचार करू शकतील.<br>5. कार्यालय प्रमुखांनी कोविडरोधी वागणुकीचे काटेकोर पालन केले जाईल, याची काळजी घ्यावी.<br>6. कार्यालय प्रमुखांनी थर्मल स्कॅनर्स, हँड सॅनिटायझर्स उपलब्ध करून द्यावेत. |

| | |
|---|---|
| खाजगी कार्यालये | 1. कार्यालय व्यवस्थापनाने वर्क फ्रॉम होमला प्रोस्ताहन देत कामकाजाच्या वेळा कमी कराव्यात. कार्यालयात 50% टक्यांपेक्षा जास्त कर्मचारी उपस्थित राहणार नाहीत, याचीही दक्षता घ्यावी तसेच कर्मचा-यांसाठी वेळांमध्ये बदल करण्याचाही विचार करावा. तसेच कार्यालये 24 तास सुरू ठेवून टप्पाटप्याने काम करण्याबाबतही विचार करावा. कार्यालयीन कामकाजाच्या वेळा असामान्य असतील आणि त्यासाठी प्रवास करणे अत्यावश्यक असेल तर अत्यावश्यक कामासाठी ओळखपत्र दाखवून परवानगी मिळवता येऊ शकेल. अशाप्रकारचा निर्णय घेताना महिला कर्मचा-यांची सुरक्षितता आणि सोयीचा विचार करणे बंधनकारक राहील.<br>2. लसीकरण पूर्ण केलेले कर्मचारीच कार्यालयात प्रत्यक्ष उपस्थित राहू शकतील. लसीकरण पूर्ण न झालेल्या कर्मचा-यांना लसीकरण पूर्ण करण्यासाठी प्रोत्साहन द्यायलाच हवे.<br>3. कार्यायल व्यवस्थापनाने सर्व कर्मचारी सर्वकाळ कोविडरोधी वागणूकीचे तंतोतंत पालन करतील याची दक्षता घ्यावी.<br>4. कार्यालय व्यवस्थापनाने थर्मल स्कॅनर्स, हँड सॅनिटायझर्स उपलब्ध करून द्यावेत. |
| लग्नसमारंभ | कमाल 50 व्यक्ती |
| अंत्यविधी | कमाल 20 व्यक्ती |
| सामाजिक, धार्मिक, सांस्कृतिक, राजकीय कार्यक्रम | कमाल 50 व्यक्ती |
| शाळा आणि कॉलेज कोचिंग क्लासेस | खाली दिलेल्या बाबी वगळता 15 फेब्रुवारीपर्यंत बंद राहतील.<br>1. विविध शैक्षणिक बोर्डांकडून दहावी आणि बारावीच्या विद्यार्थ्यांसाठी राबवायचे उपक्रम.<br>2. प्रशासकीय कामकाज आणि शिक्षकांनी अध्यापनाव्यतिरिक्त करायचे कामकाज.<br>3. शालेय शिक्षण विभाग, कौशल्य आणि उद्योजकता विकास विभाग, तांत्रिक आणि उच्च शिक्षण विभाग, वैद्यकीय शिक्षण विभाग, महिला व बालविकास विभाग आणि अन्य वैधानिक प्राधिकरणांकडून राबविण्यात येणारे किंवा परवानगी दिलेले उपक्रम.<br>4. या निर्बंधांना अपवादाच्या स्थितीत हे विभाग आणि प्राधिकरणांना राज्य आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाकडून परवानगी घ्यावी लागेल. |
| स्वीमिंग पूल, स्पा, वेलनेस सेंटर्स | बंद राहतील. |
| हेअर कटींग सलून, ब्यूटी सलून्स | 1. 50 टक्के क्षमता<br>2. रोज रात्री 10 ते सकाळी 7 पर्यंत बंद राहतील.<br>3. एकापेक्षा अधिक सुविधा असलेल्या आस्थापनांमध्ये इतर सुविधा बंद राहतील.<br>4. हेअर कटींग सलून्सनी कोव्हिडरोधी वागणुकीचे काटेकोर पालन करावे तसेच ग्राहक व केस कापणा-या सर्वांचे पूर्ण लसीकरण |

| | |
|---|---|
| | झालेले असणे बंधनकारक आहे.<br>5. अशाच उपक्रमाला परवानगी असेल की ज्यामध्ये मास्क लावणे बंधनकारक असेल. |
| खेळांच्या स्पर्धा | 1.सर्व खेळांच्या स्पर्धा पूढे ढकलण्यात येतात फक्त आधीच जाहीर केलेल्या राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावरील स्पर्धा खालील नियमांचे पालन करून सुरू राहतील.<br>1. प्रेक्षकांना बंदी<br>2. सर्व खेळाडू आणि अधिका-यांसाठी बायो-बबल<br>3. सहभागी होणा-या सर्व आंतरराष्ट्रीय आणि राष्ट्रीय खेळाडूंसाठी भारत सरकाचे नियम लागू राहतील.<br>4. सर्व खेळाडू आणि अधिका-यांसाठी दर तिस-या दिवशी आरटीपीसीआर/आरएटी टेस्ट करणे बंधनकारक.<br>2. शहर किंवा जिल्हा पातळीवर खेळांचे शिबीर, स्पर्धा आणि कार्यक्रमांच्या आयोजनाला बंदी. |
| एन्टरटेनमेंट पार्क, प्राणिसंग्रहालये, वस्तुसंग्रहालये, किल्ले, आणि अन्य सशुल्क ठिकाणे/ नागरीकांसाठीचे कार्यक्रम, स्थानिक पर्यटन स्थळे. | बंद राहतील. ( ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्प या पर्यटन स्थळाबाबत सदर आदेश दि.11.01.2022 चे रात्री 00.01 वाजेपासुन लागु राहील.) |
| शॉपिंग मॉल्स, मार्केट कॉम्प्लेक्ससमध्ये बंधनासह प्रवेश | 1. 50 टक्के क्षमता. सर्व आगंतुकांच्या माहितीसाठी अशा आस्थापनांच्या बाहेर दर्शनी ठिकाणावर एकूण क्षमता आणि सध्याची आगंतुकांची संख्या दर्शविणारा फलक लावणे बंधनकारक.<br>2. सर्व आगंतुक आणि कर्मचारी कोव्हिडरोधी वागणुकीचे तंतोतंत पालन करतील, याची दक्षता घेण्यासाठी आस्थापनांनी मार्शल्स नेमावेत.<br>3. आरएटी चाचणीसाठी बूथ/किऑक्स<br>4. फक्त लसीकरण पूर्ण झालेल्या व्यक्तींनाच परवानगी देण्यात येईल.<br>5. दररोज रात्री 10 ते सकाळी 8 पर्यंत बंद राहतील. |
| रेस्टॉरंटस् , उपाहारगृहे | 1. 50 टक्के क्षमता सर्व आगंतुकांच्या माहितीसाठी अशा आस्थापनांच्या बाहेर दर्शनी ठिकाणावर एकूण क्षमता आणि सध्याची आगंतुकांची संख्या दर्शविणारा फलक लावणे बंधनकारक.<br>2. फक्त लसीकरण पूर्ण झालेल्या व्यक्तींनाच परवानगी देण्यात येईल.<br>3. दररोज रात्री 10 ते सकाळी 8 पर्यंत बंद राहतील.<br>4. दररोज होम डिलीव्हरीला परवानगी राहील. |
| नाटयगृह, सिनेमा थिएटर्स | 1. 50 टक्के क्षमता. सर्व आगंतुकांच्या माहितीसाठी अशा आस्थापनांच्या बाहेर दर्शनी ठिकाणावर एकूण क्षमता आणि सध्याची आगंतुकांची संख्या दर्शविणारा फलक लावणे बंधनकारक.<br>2. फक्त लसीकरण पूर्ण झालेल्या व्यक्तींनाच परवानगी देण्यात येईल.<br>3. दररोज रात्री 10 ते सकाळी 8 पर्यंत बंद राहतील. |

| | |
|---|---|
| आंतरराष्ट्रीय प्रवास | भारत सरकारच्या मार्गदर्शक सुचनांनुसार. |
| देशांतर्गत प्रवास | कोविडरोधी दोन लशी किंवा राज्यात प्रवेश करण्याआधी 72 तासांपूर्वीपर्यंत आरटीपीसीआर चाचणीचा निगेटिव्ह अहवाल ग्राहय धरण्यात येईल. हे हवाई, रेल्वे आणि रस्ते या तिन्ही मार्गांनी प्रवास करणा-या प्रवाशांना लागू राहील. प्रवास करणारे वाहनचालक, वाहक आणि अन्य सहयोगी कर्मचा-यांनाही हे लागू राहील. |
| कार्गो ट्रान्स्पोर्ट, औद्योगिक कामकाज, इमारतींचे बांधकाम | पूर्ण लसीकरण केलेल्या व्यक्तींकडून सुरु राहील. |
| सार्वजनिक वाहतूक | पूर्ण लसीकरण झालेल्या व्यक्तींसाठी, नियमित वेळांनुसार |
| युपीएससी, एमपीएससी, वैधानिक प्राधिकरणे, सार्वजनिक संस्था इ. व्दारे घेतल्या जाणा-या परिक्षा | 1. राष्ट्रीय पातळीवर घेतल्या जाणा-या परीक्षा भारत सरकारच्या मार्गदर्शक सूचनांनुसार पार पाडल्या जातील. अशा परीक्षांसाठीचे प्रवेशपत्र यासाठीच्या प्रवासाची अत्यावश्यकता सिध्द करण्यास पुरेसे असेल.<br>2. राज्याच्या पातळीवर घेण्यात येणा-या परीक्षा, ज्यांच्यासाठीची प्रवेशपत्रे आधीच निर्गमित झालेली आहेत किंवा ज्यांच्या तारखा आधीच निश्चित करण्यात आल्या आहेत त्या अधिसचनेनुसार पार पडतील. अन्य सर्व परीक्षा राज्य आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाच्या मंजुरीनंतरच पार पाडल्या जातील.<br>3. परीक्षांचे संचालन करताना कोव्हिडरोधी नियमांचे काटेकोर पालन केले जाईल. |
| व्यायामशाळा | 1. 50 टक्के क्षमतेने<br>2. व्यायामशाळेमध्ये कुठल्याही प्रकारच्या व्यायाम /ॲक्टीव्हीटी करतांना मास्क काढण्याची परवानगी नसेल.<br>3. पुर्ण लसीकरण झालेल्यांनाच या सुविधेचा लाभ घेता येईल.<br>4. व्यायामशाळेमध्ये कार्यरत असलेले सर्व कर्मचा-यांची पूर्ण लसीकरण झालेले असावे. |

1. प्रवासासाठी अत्यावश्यक कारणे
    1. वैद्यकीय ईमरजन्सी.
    2. अत्यावश्यक सेवा (अत्यावश्यक सेवांची यादी परिशिष्ट 1 मध्ये दिल्यानुसार राहील.)
    3. विमानतळ, रेल्वे स्थानक, बस स्थानक येथे जाणे किंवा येण्याआधी वैध तिकीटासह.
    4. 24 तास सुरू राहणा-या कार्यालयांसाठी, विविध पाळीमध्ये काम करण्यासाठी तेथील कर्मचा-यांचा प्रवास अत्यावश्यक मानला जाईल.
2. कोव्हिडरोधी वागणुकीसाठीचे नियम परिशिष्ट 2 मध्ये नमूद केल्यानुसार राहतील
3. दुकाने, रेस्टॉरंटस्, हॉटेल्स तसेच ई-कॉमर्स किंवा होम डिलीव्हरी करणा-य आस्थापनेतील सर्व कर्मचा-यांचे लसीकरण पूर्ण झालेले असणे बंधनकारक राहील. यासाठी व्यवस्थापनाला जबाबदार धरण्यात येईल आणि यासाठी आवश्यक बाबींची पूर्तता न केल्याचे आढळल्यास बंद करण्यात येईल. या कामात सहभागी असलेल्या कर्मचा-यांची नियमित वेळांनतर सदर आस्थापनेने आरएटी चाचणी करून घेणे गरजेचे आहे.
4. कोव्हिड व्यवस्थापनच्या कामासाठी राज्य सरकारची कार्यालये, किंवा राज्य सरकारव्दारे अर्थसहाय्यित अन्य संस्थांचे कर्मचारी आणि संसाधने यांची मागणी करण्याचे संपूर्ण अधिकार जिल्हा आपत्ती

व्यवस्थापन प्राधिकरणाला राहतील.

5. या आदेशपत्रकासोबत परिशिष्ट-1 मध्ये अत्यावश्यक सेवांची यादी आणि परिशिष्ट-2 मध्ये कोव्हिडरोधी वागणुकीशी संबंधित नियमांचा तपशिल जोडले असून सदर परिशिष्ट-1 व परिशिष्ट-2 चे काटेकोरपणे पालन करण्यात यावे.

सदर आदेशाची कोणतीही व्यक्ती, संस्था किंवा संघटना यांनी अंमलबजावणी करण्यास टाळाटाळ केल्यास अथवा विरोध दर्शविल्यास संबंधीताविरुध्द आपत्ती व्यवस्थापन कायदा, 2005 चे कलम 51 ते 60 व भारतीय दंड संहिता, 1860 चे कलम 188 तसेच साथरोग कायदा, 1897 अन्वये दंडनीय/कायदेशीर कार्यवाही संबंधीत पोलीस अधिकारी/कर्मचारी तसेच इतर संबंधित अधिकारी/ कर्मचारी यांनी करावी.

**सदर आदेशसंपुर्ण चंद्रपूर जिल्हयाचे कार्यक्षेत्रात दिनांक 10.01.2022 चे 00.01 वाजेपासुन पुढील आदेशापावेतो लागू राहील.**

**सदर आदेश माझे सही व शिक्क्यानिशी दि. 09.01.2022 रोजी निर्गमीत करण्यात येतआहे.**

स्वा/-

(अजय गुल्हाने)

**जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष**

**जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, चंद्रपूर**

**प्रतिलीपी :-माहितीस सविनय सादर.**

1. मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई-032
2. मा. सचिव, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन, महसुल व वनविभाग, मंत्रालय, मुंबई32
3. मा. विभागीय आयुक्त, नागपूर विभाग, नागपूर .

**माहितीस तथा उचित कार्यवाहीस्तव.**

4. पोलीस अधिक्षक, चंद्रपूर
5. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, चंद्रपूर
6. आयुक्त, चंद्रपूर शहर महानगरपालीका, चंद्रपूर
7. अधिष्ठाता, शासकिय वैद्यकिय महा.चंद्रपूर
8. जिल्हा शल्य चिकीत्सक, चंद्रपूर
9. जिल्हा आरोग्य अधिकारी, जि.प.चंद्रपूर
10. जिल्हा माहिती अधिकारी, चंद्रपूर
11. धर्मदाय आयुक्त,चंद्रपूर
12. उपविभागीय दंडाधिकारी (सर्व)
13. जिल्हा क्रिडा अधिकारी,चंद्रपूर
14. तहसिलदार तथा तालुका दंडाधिकारी (सर्व)
15. संवर्ग विकास अधिकारी, पंचायत समिती (सर्व)
16. मुख्याधिकारी, नगर परिषद / नगर पंचायत(सर्व)

**सदर आदेशास उपरोक्त अधिकारी यांनी प्रसिध्दी द्यावी.**

9/1/22

**जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष**

**जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण,चंद्रपूर**

## परिशिष्ट-१
## अत्यावश्यक सेवा

१. **अत्यावश्यक सेवांमध्ये पुढील सेवांचा समावेश होतो:-**

1. रुग्णालये, रोगनिदान केंद्रे, चिकित्सालये, वैद्यकीय विमा कार्यालये, औषध विक्रेते, औषध निर्माण कंपन्या, इतर उत्पादन व वितरणासह वैद्यकीय व आरोग्यसेवा तसेच त्यांचे डीलर्स, वाहतूक व वितरण साखळी. कोविड साथरोग संबंधी लस, सॅनिटायझर, मास्क, वैद्यकीय साहित्ये, कच्चे उत्पादने/सेवा इ.
2. व्हेटरीनरी हॉस्पीटल्स/ॲनिमल केअर सेंटर्स व पेट फुड शॉप्स
3. वनविभागाने घोषित केलेले वनीकरणा संदर्भातील कामे
4. ऍविएशन आणि संबंधी सेवा (एअरलाईन, विमानतळे, देखभाल, कार्गो, इंधन, सुरक्षा इ.)
5. किराणा मालाची दुकाने, भाजीपाल्याची दुकाने, फळविक्रेते, दूधपुरवठा केंद्रे (दुग्धशाळा), बेकरी, मिठाईची दुकाने व इतर सर्व प्रकारची खाद्यान्न दुकाने. (**परंतु पानटपरी/पानठेले, तंबाखुजन्य व्यवसाय सुरु ठेवता येणार नाही.**)
6. कोल्ड्स स्टोरेज व वेअरहाऊसिंग संबंधित सेवा
7. सार्वजनिक परिवहन- रेल्वेगाड्या, टॅक्सी, ऑटो रिक्षा व सार्वजनिक बस.
8. विविध देशांच्या राजदूतांच्या कार्यालयांच्या कामकाजाशी संबंधित असलेल्या सेवा.
9. स्थानिक प्राधिकरणांद्वारे केली जाणारी मान्सूनपूर्व (पावसाळापूर्व) कामे.
10. स्थानिक प्राधिकरणांद्वारे पुरविल्या जाणाऱ्या सर्व सार्वजनिक सेवा.
11. भारतीय रिझर्व बँकेने विनियमित केलेल्या संस्था
12. टेलिकॉम सेवाशी संबंधित देखभाल/दुरुस्तीची कामे
13. मालवाहतूक.
14. पाणी पुरवठाशी संबंधित कामे
15. कृषी संबंधित सेवा व बी-बियाणे, खते, साहित्ये, दुरुस्ती इ. दुकाने
16. साहित्यांचे निर्यात-आयात
17. ई- वाणिज्य (केवळ अत्यावश्यक साहित्यांचे पुरवठा संदर्भात)
18. अधिस्वीकृत प्रसारमाध्यमे
19. पेट्रोलपंप आणि पेट्रोलियमशी संबंधित असलेली उत्पादने
20. सर्व कार्गो सेवा
21. विदा केंद्रे (डेटासेंटर्स)/क्लाऊड सेवा पुरवठादार / निर्णायक स्वरूपाच्या (क्रिटिकल) पायाभूत सुविधा व सेवा यांना सहाय्यभूत असणाऱ्या माहिती तंत्रज्ञान सेवा.
22. शासकीय व खाजगी सुरक्षा सेवा
23. इलेक्ट्रिक व इंधन गॅस पुरवठा
24. बँकांची एटीएम्स
25. पोस्टल सेवा
26. सीमाशुल्क गृह अभिकर्ते/लसी /जीवरक्षकऔषधे/औषध निर्मितीशी संबंधित उत्पादने यांची वाहतूक करण्यामध्ये सहयोगी असलेले लायसन्स धारक बहुप्रतिमान वाहतूक कार्य चालक

27. अत्यावश्यक सेवामध्ये मोडणाऱ्या बाबींकरिता पॅकेजिंग करणारी उत्पादने.
28. पावसाळ्यात आवश्यक असणाऱ्या महत्त्वाच्या साधन सामुग्रीशी संबंधित उत्पादने
29. केंद्र, राज्य, स्थानिक स्वराज्य संस्थेचे कार्यालये तसेच त्यांचेशी संबंधित वैधानिक संस्थेचे कार्यालये
30. सार्वजनिक बँका, सार्वजनिक उपक्रम, सहकारी संस्था
31. अत्यावश्यक सेवा उपलब्ध करुन देणाऱ्या कंपन्यांची कार्यालये
32. वीमा/आरोग्य् वीमा कार्यालये
33. औषध उत्पादन/वितरणसंबंधी फार्मासिटयुकल कंपनी
34. आरबीआई तर्फे मान्यताप्राप्त सीसीआएल, एनपीसीआई, पेमेंट सिस्टीम इ.
35. सर्व नॉन बँकिंग वित्त महामंडळे
36. सर्व वैध सूक्ष्म वित्त पुरवठा संस्था
37. न्यायालये, लवादे, चौकशी कार्यालये, वकिलांचे कार्यालये
38. जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाने घोषित केलेले अत्यावश्यक सेवासंबंधित दुकाने/आस्थापना
39. आपले सरकार केंद्र/सीसीसी/सेतु केंद्र (**परंतु सदर ठिकाणी ५ पेक्षा अधिक लोक एकत्र येणार नाहीत याची दक्षता संबंधितांनी घेण्यात यावी.**)

२. **संकीर्ण:-**

1. उक्त निर्देशांचे काटेकोर अंमलबजावणी करण्याची जबाबदारी ही संबंधित तालुक्यांचे **तहसिलदार** तथा इन्सिडंट कमांडटंट यांची असेल. त्यांनी संबंधित क्षेत्राचे मुख्याधिकारी-न.प./न.पं., पोलीस निरीक्षक यांचेसमवेत आवश्यक अंमलबजावणी करावी. तसेच गर्दीचे ठिकाणांवर, दुकानांमध्ये उक्त निर्देशांचे पालन होत आहे किंवा नाही याबाबत भरारी पथकांच्या माध्यमांतून उचित संनियंत्रण ठेवावे. जे व्यक्ती/आस्थापना/दुकाने कोविड-१९ साथरोग संदर्भाने निर्देशांचे पालन करीत नसल्याचे निदशर्नास आल्यास त्यांचेवर रीतसर कारवाई करण्यात यावी.
2. संबंधित आदेशांचे योग्य अंमलबजावणी होत असल्याबाबत संनियंत्रयणाची जबाबदारी ही संबंधित क्षेत्राचे **उपविभागीय अधिकारी (राजस्व)** यांची असेल.
3. आरोग्य विभागाने कोविड-१९ लसीकरणासंदर्भाने व्यापक जनजागृती करावी व लवकरात लवकर **लसीकरण** उद्दिष्ट पूर्ण करण्याच्या दृष्टीने काटेकोर नियोजन करावे व आवश्यक उपाययोजना पूर्ण करावे तसेच कोविड-१९ चा प्रसार रोखण्यासाठी टेस्ट-ट्रेक-ट्रीट या त्रिसुत्रीचा व्यापक प्रमाणात वापर करावा.
4. सर्व संबंधित अधिकारी/कर्मचारी व विभागांनी आरटीपीसीआर तपासणींची संख्या वाढवावी.
5. महसूल/पोलीस/स्थानिक स्वराज्य संस्था यांनी कोविड-१९ साथरोगसंदर्भाने प्रशासनाने दिलेल्या निर्देशांचे पालन न करणाऱ्यांवर प्रभावीपणे दंडात्मक कारवाई करावी.
6. सर्व संबंधित यंत्रणांनी अत्यावश्यक साधने व सुविधा यांची साठेबाजी व काळाबाजार करणाऱ्यांविरुद्ध नियमाप्रमाणे कठोर कारवाई करावी.

## परिशिष्ट २

## कोविड अनुरूप वर्तन (CAB)

**व्याख्या:**

कोविड 19 विषाणूचा प्रसार रोखण्यासाठी व्यक्ती आणि संस्थांना आवश्यक असलेले दैनंदिन सामान्य वर्तन म्हणून कोविड अनुरूप वर्तनाची व्याख्या केली जाऊ शकते ज्यामुळे साथरोग प्रसाराची साखळी खंडित होते. कोविड अनुरूप वर्तन म्हणून वैशिष्ट्यीकृत वर्तनातंर्गत खाली नमूद केलेल्या पैलूंचा समावेश आहे आणि अशा सर्व तर्कसंगत बाबी देखील समाविष्ट आहेत जे कोविड १९ विषाणूच्या प्रसारास अडथळा आणू शकतात त्याची कार्यपद्धती खालीलप्रमाणे असून सदर मूलभूत कोविड अनुरूप वर्तनातंर्गत सदर बाबींचे पालन सर्व संबंधितांने करणे अनिवार्य आहे.

a) मास्कचा वापर नेहमी योग्य पद्धतीने करावा. मास्कने नेहमीच नाक आणि तोंड झाकले गेले पाहिजे.(रुमाल/गमचा/दुपट्टा इ. हा मुखपट्टी म्हणून मानला जाणार नाही आणि व्यक्ती नियमाप्रमाणे दंडास पात्र असेल.)

b) जिथे शक्य असेल तिथे नेहमीच सामाजिक अंतर (६ फूट अंतर) राखावे.

c) हात साबणाने किंवा सॅनिटायझरने वारंवार आणि स्वच्छ धुवावेत.

d) हात सॅनिटायझरने धुतलेले नसल्यास हाताने नाक/डोळे/तोंडाला स्पर्श करणे टाळावे.

e) हवा खेळती राहण्याकरीता व्हेंटीलेशन व्यवस्थित राहील याबाबत दक्षता घ्यावी.

